घड्याळ म्हंटल की..
विठ्ठल वॉच
नामवंत कंपन्यांची घड्याळे
मिळतील विक्री व दुरुस्ती
सुधाकर कॉम्प्लेक्स,नगरपलिकेसमोर
मायणी रोड,विटा (जि.सांगली)
८२६२८३५३९१-९४२१२२१६३०

# प्रीतिसंगम

www.pritisangam.com
सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर

श्री चैतन्य टेस्ट ट्युब बेबी सेंटर
तुमच्या मातृत्वाच्या स्वप्नांना आमची साथ..!
आपले आई-बाबा
होण्याचे स्वप्न
आता पूर्ण होईल!

६०००+
8484-86-1900
» शाखा «
बारामती | सातारा | अहिल्या नगर

वर्ष २९ वे | अंक ७६ | पाने ४ | बुधवार | दि. १६ जुलै २०२५ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५

# शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे शशिकांत शिंदे नवे प्रदेशाध्यक्ष

## जयंत पाटील यांनी दिला राजीनामा

**मुंबई/प्रतिनिधी:-**

माजी मंत्री तथा आमदार जयंत पाटील यांनी आपल्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला .त्यानंतर शरद पवार राष्ट्रवादी गटाच्या प्रदेशाध्यक्ष पदाचा भार कोणाला दिला जाणार याविषयी राजकीय वर्तुळात उत्सुकता होती मुंबई येथे मंगळवारी झालेल्या बैठकीमध्ये आमदार शशिकांत शिंदे यांच्याकडे या पदाची जबाबदारी देण्यात आली आहे राष्ट्रवादी अध्यक्ष खासदार शरद पवार यांनीच त्यांच्या नावाची घोषणा केली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षाला चांगला विजय मिळवून देण्याची त्यांच्यावर जबाबदारी राहणार आहे



लोकसभा निवडणुकीदरम्यान पक्षात फेरबदल व्हावेत, अध्यक्षपदाची सूत्रे दुसऱ्या नेत्याकडे द्यावीत, अशी पक्षांतर्गत मागणी होऊ लागली. मात्र लोकसभा निवडणुका जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखालीच लढल्या जातील, असे शरद पवार यांनी स्पष्टपणे सांगितले. पाच वर्षे बांधलेले संघटन, बिनचूक उमेदवारांची निवड आणि सरकारविरोधी जनमताचा फायदा राष्ट्रवादीला होऊन लोकसभा निवडणुकीत जयंतरावांच्या नेतृत्वात १० पैकी तब्बल ८ खासदार निवडून आले. विधानसभेलाही हीच रणनीती कायम ठेवून जयंत पाटील यांनी राज्य पिंजून काढले. परंतु यावेळी महायुतीने मविआला जोरदार धोबीपछाड दिल्याने जयंतरावांना पक्षाची सदस्यसंख्या विशीपारही घेऊन जाण्यात अपयश आले. तेव्हापासून जयंत पाटील यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीजोर धरू लागली. जुलै २०१८ ते जुलै २०२५ अशी सात वर्षे जयंत पाटील यांनी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्षपद भूषवले.

शशिकांत शिंदे पश्चिम महाराष्ट्रातील नेते. माथाडी कामगार संघटनांमध्ये त्यांचे वजन आहे, त्यामुळे नवी मुंबईच्या राजकारणातही त्यांचा वावर असतो. कोरेगाव विधानसभेचे दोन वेळा त्यांनी प्रतिनिधित्व केले. शशिकांत शिंदे यांच्या रुपाने राष्ट्रवादीला पुन्हा मराठा प्रदेशाध्यक्ष मिळाले आहेत. लढाऊ, झुंजार आणि आक्रमक शैलीत विरोधकांवर तुटून पडणारे अशी त्यांची ओळख आहे. शशिकांत शिंदे यांचे शरद पवार यांच्याशी अतिशय निकटचे संबंध आहेत. प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांच्यासमोरील पहिली चाचणी असेल स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका. राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर पक्ष संघटना दुभंगली आहे. स्थानिक पातळीवर पक्षाचे म्हणावे असे संघटन नाही. त्यामुळे पुढील तीन ते चार महिन्यात गावोगावी जाऊन पक्षाचा विचार जनमाणसांत पेरण्याचे पहिले काम शशिकांत शिंदे यांना करावे लागणार आहे. तसेच राज्यात विभागवार आढावा घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांची गणिते शिंदे यांना जुळवावी लागतील.

# कोयनेचे दरवाजे उघडले

### *प्रतिसेंकद ५५०० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू.
### *नदीकाठावरील नागरिकांना सतर्कतेचा इशारा..

**पाटण/प्रतिनिधी:-**

कोयना धरण छत्रपती शिवाजी महाराज जलाशय क्षेत्रासह सातारा जिल्ह्याच्या पश्चिम भागात संततधार सुरू असलेल्या पावसाने कोयना धरणाची पाणी पातळी २१३७.०३ फूट तर ७६.५२ टिएमसी झाली आहे. धरणातील पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी काल मंगळवारी सकाळी ११ वा. धरणाचे वरील सहा वक्र दरवाजे दिड फूटावर उघडून ३,४०० क्युसेक्स तर पायथा विद्युत गृहातून २१०० असे ५५०० क्युसेक्स पाणी कोयना नदीपात्रात सोडण्यात आले आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पाऊस, धरणामध्ये येणारी आवक आणि उर्वरित मान्सून कालावधी विचारात घेता कोयना जलाशय परिचलन सूचीनुसार धरणातून पाणी सोडण्यात आल्याचे धरण व्यवस्थापनाने सांगितले आहे.

मंगळवार दि. १५ जुलै २०२५ रोजी सकाळी ११:०० वा. कोयना धरणाचे सहा वक्र दरवाजे १ फूट ६ इंच उघडून ३४०० क्युसेक विसर्ग कोयना नदीपात्रात सोडण्यात आला आहे. कोयना धरण पायथा विद्युतगृहाचे दोन्ही युनिट सुरू असून त्याद्वारे २१०० क्युसेक्स विसर्ग सुरू आहे. कोयना नदीमध्ये एकूण ५५०० क्युसेक प्रतिसेंकद पाण्याचा विसर्ग सुरू झाला आहे. यामुळे कोयना नदीपात्रातील पाण्यात वाढ झाली आहे. तरी नदी काठावरील गावांनी सतर्क राहावे असा इशारा कोयना धरण व्यवस्थापनाने दिला आहे.

मंगळवारी सायंकाळी ५ वा. कोयना धरणातील पाणी साठा ७६.५२ टिएमसी झाला तर ६५१.४३४ मीटर झाला आहे. सद्या धरणात प्रतिसेंकद- २५४७८ क्युसेक्स पाण्याची आवक सुरू असून २.२० टिएमसीने वाढ झाली आहे. गेल्या २४ तासात सोमवारी सायंकाळी ५ वा. ते मंगळवारी सायंकाळी ५ वा. पर्यंत कोयना- १२३ (२३५०) मि.मी, नवजा- १६७, (२२३५) मि.मी, महाबळेश्वर- १९२, (२३१८) मि.मी. पावसाची नोंद झाली आहे.



कोयना धरणाच्या सहा वक्र दरवाज्यातून पाणी सोडण्यात आल

## घरात घुसून मारहाण केल्याप्रकरणी तीन जणांवर गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:-**

घरात घुसून मारहाण केल्याप्रकरणी तीन जणांविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १३ रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास प्रदीप धर्मेंद्र पोफळे रा. संभाजीनगर, सातारा यांच्या घरात घुसून त्यांना व त्यांचा भाऊ संदीप याला मारहाण, तसेच त्यांच्या पत्नीस शिवीगाळ केल्याप्रकरणी निखिल जगदीप पवार रा. कोडोली, एमआयडीसी सातारा व त्याच्यासोबत असलेल्या दोन अनोळखी इसमांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास महिला पोलीस हवालदार सावंत करीत आहेत.

## राहत्या घरातून युवती बेपत्ता

**सातारा/प्रतिनिधी:-**

राहत्या घरातून एक युवती बेपत्ता झाल्याची फिर्याद सातारा तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १३ ते १४ जुलै दरम्यान सातारा तालुक्यातील एका गावात राहणारी वीस वर्षीय युवती राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता निघून गेली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार गोरे करीत आहेत.

### प्रवीण गायकवाड शाईफेक प्रकरण..

# सोलापूरात मराठा समाजाच्या बैठकीत गोंधळ

**सोलापूर/प्रतिनिधी:-**

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांना रविवारी (१३ जुलै) अक्कलकोट येथे काळं फासण्यात आल्याची घटना घडली होती. अक्कलकोट येथील स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या सत्कारनिमित्त प्रवीण गायकवाड हे रविवारी पत्नीसह अक्कलकोटला आले होते, यावेळी ही घटना घडली. या घटनेनंतर मराठा समाजाने आक्रमक भूमिका घेतली आहे. जशास तसं उत्तर देणार असल्याचा इशारा देखील दिला आहे. दरम्यान, आज सोलापूरच्या शासकीय विश्रामगृह येथे प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या शाईफेक प्रकरणात भूमिका ठरवण्यासाठी मराठा समाजाची बैठक आयोजीत केली होती. जिल्ह्याभरातून मराठा समन्वयक या बैठकीला आलेत. मात्र, या बैठकीत तुफान गोंधळ झाल्याचे पाहायला मिळाले.

प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या शाईफेक प्रकरणात भूमिका ठरवण्यासाठी मराठा समाजाची आज सोलापुरात बैठक आयोजीत केली होती. या बैठकीला मोठ्या संख्येनं सोलापूर जिल्ह्यातून पदाधिकारी आले होते. यावेळी बैठक सुरु असतानाच अमोल राजे भोसले यांच्या विरोधात एका कार्यकर्त्याने वक्तव्य केले. त्यानंतर अमोल राजे भोसले यांचे समर्थक कार्यकर्ते भडकले. तसेच विरोधात बोलणाऱ्याला मारहाण देखील केली आहे. या बैठकीत सर्वजण आपले विचार व्यक्त करत होते. त्यावेळी एका तरुणाने अक्कलकोट स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख अमोलराजे भोसले यांच्यावर टीका केली म्हणून एका तरुणाला मारहाण केली आहे. यामुळं बैठकीच्या ठिकाणी मोठा गोंधळ उडाल्याचे पाहायला मिळाले.

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर शाई फेक करणारा दीपक काटे हा भाजपचा पदाधिकारी आहे. दीपक काटे हा भाजप युवा मोर्चाचा प्रदेश सचिव असल्याची माहिती मिळाली आहे. दीपक काटे याच्या फेसबुक अकाउंटवर देखील भाजप पदाधिकारी असल्याचा उल्लेख आहे. तर भाजपचा गमजा घातलेला दीपक काटे याचा फोटो देखील समोर आला आहे.

प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा अनेकांनी तीव्र निषेध केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास घरात घरात



पोहोचवण्याचं काम संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून प्रवीण गायकवाड यांनी केले आहे. खरा इतिहास सांगणाऱ्यांवर हल्ले केले जात आहेत आणि विकृती सांगणाऱ्यांना अभय दिला जातोय. तुम्ही जी विकृती तयार कराल ती ठेचण्याची ताकद आमच्यामध्ये आहे. आज जो प्रकार घडला आहे त्याला योग्य तेच उत्तर आम्ही देणार असल्याची भूमिका मराठा सेवा संघाने मांडली आहे. विचाराचा लढा विचाराने देऊ. तुम्ही जर कायदा हातात घेणार असाल तर याला सुद्धा आम्ही आमच्या भाषेत उत्तर देणार असल्याचा इशारा मराठा सेवा संघाने दिली आहे.

# वनवासमाची गावच्या हद्दीत दुचाकीस्वार ठार

**उंब्रज/प्रतिनिधी:-**

वनवासमाची ता.कराड गावच्या हद्दीत कराड ते सातारा प्रवास करणारा दुचाकीस्वार महामार्गाचे लगत असणाऱ्या डिव्हायडरला धडकून एक इसम जागीच ठार झाला असल्याची घटना मंगळवार दि.१५ रोजी पहाटेच्या सुमारास घडली आहे यामध्ये इतर दोन जण जखमी आहेत.याबाबतची फिर्याद महादेव उत्तम मंडले वय ४५ वर्षे व्यवसाय पोलीस पाटील रा. वनवासमाची ता. कराड जि.सातारा यांनी दिली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मंगळवार दि. १५ रोजी पहाटे ०३.३० वा.चे पूर्वी वनवासमाची ता.कराड गावचे हद्दीत कराड ते सातारा जाणारे हायवे रोडचे पुलाजवळ दक्षिण बाजूला चढाला लावले बॉन्ड्रीवॉलला(डिव्हायडर) राहूल दिनकर सांळुखे वय २६ वर्षे रा. चिखली ता बत्तीस शिराळा जि.सांगली यांने त्याचे ताब्यातील होंडा शाईन कंपनीची मोटारसायकल क्रं एम एच ०८ ए यु ८९६० ही वेगात चालवून रस्त्याचे परिस्थीकडे दुर्लक्ष करून चालवून रोडचे कडेला लावले बॉन्ड्रीवॉलला (डिव्हायडर) धडकून अपघातकरून त्याचे दोन मित्र यांना किरकोळ व गंभीर जखमी करून व स्वतःचे मृत्यूस व मोटारसायकचे नुकसानीस कारणीतभूत झाला आहे.याबाबत तळबीड पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे.

# हजारमाची येथे युवकाला फायटरने मारहाण

**कराड/प्रतिनिधी:-**

हजारमाची, ता. कराड येथे भांडण सोडवल्याचा राग मनात धरून युवकाला फायटर आणि स्टील पाईपने मारहाण करण्यात आली. सोमवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. याप्रकरणी कराड शहर पोलीस ठाण्यात दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत जखमी सुरज आनंदा बागल (वय ३०) रा. हजारमाची-ओगलेवाडी याने कराड शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, हजारमाची-ओगलेवाडी येथील सुरज बागल हा युवक सेंट्रींग काम करतो. काही दिवसांपूर्वी त्याचा चुलतभाऊ राजेंद्र विलास बागल याचा ओगलेवाडी येथील शिवा माळी याच्याशी वाद झाला होता. त्यावेळी सुरज याने दोघांमधील भांडणे सोडवली. सोमवारी सायंकाळी सुरज हा कामावरून घरी परत जात असताना शिवा माळी याने त्याला अडवले. राजेंद्र बागल याच्याशी माझी भांडणे सुरू असताना तू मध्ये का पडलास, असे म्हणून त्याने सुरजच्या तोंडावर फायटरने मारहाण केली. त्यामध्ये सुरज जखमी झाला. त्याचवेळी शिवा माळी याच्या मित्राने स्टीलच्या पाईपने डोक्यात मारल्यामुळे सुरजच्या डोक्यात गंभीर जखम होऊन त्यातून रक्त वाहू लागले.

सुरज गंभीर जखमी झाल्यानंतर दोघे संशयित तेथून निघून गेले. त्यानंतर शफिक मुबारक तांबोळी यांच्यासह नागरिकांनी जखमी सुरज याला उपचारार्थ रुग्णालयात दाखल केले. याबाबतची नोंद कराड शहर पोलीस ठाण्यात झाली आहे.

## सजग..

प्रदुषित झाली हवा
जमता युध्दाचे ढग
अस्वस्थ वातावरण
झाकाळून गेले खग
कलकलाट भितीचा
भेदरे सामान्यविहग
बालिग मूढ नेत्यांना
लढाई हवी लगोलग
भ्रमिष्ट करते अफवा
कार्यान्वित होई ठग
कितीदा अनुभवली
महा युध्दांची ती धग
इतिहास देई जाणीव
कशी झाली भग भग
दुर्बळते अर्थव्यवस्था
कशीबशी धरली तग
अंदाज असे विदारक
किती होणारं तगमग
अणू युद्ध वाट पाहते
कधी दाखवी झगमग
सुजाणशिक्षीत जगत
तरीहीयेत नाही उमग
जागृती रे निरूपयोगी
विध्वंसझाल्यावर मग
ज्वालामुखीअधिष्ठीत
अस्वस्थ रे अवघे जग
प्रश्न सतावतोय उबग
होणारं कसे हो सजग

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**



# भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला पृथ्वीवर परतले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:-**

भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला आपल्या चार सहकाऱ्यांसह सुरक्षितपणे पृथ्वीवर परतले आहेत. त्यांचे ड्रॅगन अंतराळयान कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्यावर यशस्वीरीत्या उतरले आहे. सुमारे १८ दिवस अंतराळात राहिल्यानंतर त्यांनी अनेक शास्त्रीय प्रयोग पूर्ण केले आहे.

# कृष्णा कारखान्यास सर्वोत्कृष्ट डिस्टीलरीसाठी राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

**रेठरे/प्रतिनिधी:-**

रेठरे बुद्रुक (ता. कराड) येथील य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्यास सर्वोत्कृष्ट डिस्टीलरीसाठी राष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. देशातील साखर उद्योगात अग्रगण्य असणाऱ्या भारतीय शुगर संस्थेच्यावतीने हा पुरस्कार कोल्हापूर येथे शुक्रवारी (ता. १८) होणाऱ्या शानदार सोहळ्यात प्रदान करण्यात येणार आहे.



कृष्णा कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना प्रशासनाने नेहमीच नवनवीन प्रयोग करत, शेतकरी सभासदांचे हित साधले आहे. साखर उत्पादनासोबतच कारखान्याच्या माध्यमातून उपपदार्थ निर्मितीवर भर दिला आहे. कारखान्यात उच्च प्रतीचे इथेनॉल, देशी मद्य, रेक्टीफाईड स्पिरिट इत्यादींचे उत्पादन घेतले जाते.

कृष्णा कारखान्याच्या डिस्टीलरीमध्ये सर्वोच्च फर्मन्टेशन आणि डिस्टलेशन कार्यक्षमतेसह १२८ % प्रकल्प क्षमतेचा वापर केला आहे. तसेच निर्धारित वेळेत ऑईल कंपन्यांना संपूर्ण इथेनॉल प्रमाणाचा पुरवठा यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. त्याचबरोबर सर्व नियामक आणि ग्राहक मानकांची पूर्तता करून, रेक्टिफाइड स्पिरिटची उच्च गुणवत्ता सातत्याने राखली आहे. या सर्व कार्याची नोंद घेत संस्थेने हा पुरस्कार कृष्णा कारखान्याला जाहीर केला आहे.

भारतीय शुगरच्यावतीने कोल्हापूर येथे शुक्रवार दि. १८ जुलै २०२५ रोजी आयोजित साखर परिषदेच्या वार्षिक पारितोषिक सोहळ्यात मान्यवरांच्या उपस्थितीत कृष्णा कारखान्यास सर्वोत्कृष्ट डिस्टीलरीसाठी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केला जाणार असल्याची माहिती मॅनेजिंग डायरेक्टर बाजीराव सुतार यांनी दिली.

## ‘कृष्णा’ची राष्ट्रीय पुरस्कारांची हॅट्रीक

गतवर्षी भारतीय शुगरकडून कृष्णा कारखान्याला सर्वोत्कृष्ट कारखाना राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले होते. याच महिन्यात राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघाच्यावतीने नवी दिल्ली येथे कारखान्याला नुकताच उच्च तांत्रिक कार्यक्षमतेसाठी प्रथम क्रमांकाचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. तर आता भारतीय शुगरकडून सर्वोत्कृष्ट डिस्टीलरीसाठी राष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. यामुळे कृष्णा कारखान्याने दोन वर्षात सलग तीन राष्ट्रीय पुरस्कार मिळविण्याची हॅट्रीक साधली आहे.

# झेडपी चौकातील अतिक्रमणे बांधकाम विभागाने हटवली

## सातारा पोलिसांचा परिसरात तगडा बंदोबस्त

**सातारा/प्रतिनिधी:-**

सातारा जिल्हा परिषद चौक ते बॉम्बे रेस्टॉरंट चौक यादरम्यानची सातारा कोरेगाव रस्त्यावरील असणारी टपऱ्यांची अतिक्रमणे सार्वजनिक बांधकाम विभागाने कारवाई करून हटवली यामुळे या रस्त्याने आज मोकळा श्वास घेतला यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

सातारा कोरेगाव रस्ता अत्यंत आधारित असून यालाच्या लगेच फुटपाथ व अतिक्रमणे वाढल्यामुळे नागरिकांची अडचण होत होती . फळ विक्रेते, स्टॉलवाले,टपरी, हात गाडीवाले यांची मोठी अतिक्रमणे या रस्त्यावर झाली होती .या रस्त्यावर टपऱ्यांची पथारी थेट रस्त्यावर येऊ लागल्याने वाहतुकीची कोंडी सुरू झाली होती . तसेच वाहन चालकांना पार्किंगची अडचण येत होती तरीसुद्धा सार्वजनिक बांधकाम विभाग त्यांच्यावर कारवाई करत नव्हता मात्र मंगळवारी दुपार बारा वाजल्यानंतर जेसीबी डंपर १५ कर्मचारी आणि अभियंता विभागाचे काही अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी टपऱ्या काढण्यास सुरुवात केली

या टपरी चालकांना पंधरा दिवसापूर्वी इशारा नोटीस देण्यात आल्याची माहिती आहे नागरिकांच्या वतीने लेखी व तोंडी तक्रारी सातारा नगरपालिकेकडे झाल्या होत्या मात्र रस्त्यांचे स्वामित्व आणि देखभाल दुरुस्ती या आस्थापना वेगवेगळ्या असल्यामुळे कारवाईची अडचण होत होती सुमारे दीड तास ही



कारवाई सुरू होती सातारा शहर पोलिसांनी यावेळी परिसरात मोठा बंदोबस्त तैनात ठेवला होता काही ठिकाणी विक्रेते आणि कर्मचारी यांच्या जोरदार वादावादी झाली मात्र पोलिसांनी ठाम भूमिका घेतल्याने अनेक टपरी चालकांनी आपल्या टपऱ्या स्वतःहून काढून घेतल्या . या परिसरातील हातगाडी दुकानाचे फलक लोखंडी अडथळे हटवण्यात आले जेसीबी आणि ट्रॅक्टरचा या कारवाईसाठी वापर करण्यात आला सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता प्रशांत खैरमोडे यांनी या कारवाईला दुजोरा दिला संबंधित अतिक्रमणधारकांना पंधरा दिवसापूर्वीच याबाबतच्या सूचना दिल्याचे त्यांनी सांगितले यापुढे पुन्हा अतिक्रमण झाल्यास पुन्हा ही कारवाई केली जाईल असा त्यांनी इशारा दिला आहे .

महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
■ इलेक्ट्रिकल सुपरवायझर ■ ऑटोमोबाईल टेक्निशियन
■ इलेक्ट्रिकल वायरमन ■ मोटार वायडिंग
■ टू-व्हीलर मेकॅनिक ■ फोर व्हीलर मेकॅनिक
■ A.C. मेकॅनिक ■ वेल्डर / प्लंबर
■ कॉम्प्युटर ऑपरेटर ■ कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

# खंडित वीज पुरवठ्याचा शाहूनगरवासीयांना फटका

## पाणीपुरवठ्यामध्ये व्यत्यय,महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना पुन्हा घेराव

**सातारा/प्रतिनिधी:**

सातारा शहराच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या शाहूनगर भागाला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पाणी मिळताना बरीच यातायात करावी लागत आहे .वारंवार होणाऱ्या खंडित वीज पुरवठ्यामुळे येथील टाक्यांना लेवल मिळत असल्याने टाईम पावसाळ्यात शाहूनगर वासियांना टँकरचे पाणी घेण्याची वेळ आली आहे .या संदर्भात वीज वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता जिल्हाधिकारी यांच्या समवेत बैठक लावून हा प्रश्न निकाली काढण्यात येईल असे आश्वासन कार्यकारी अभियंता अजित वाघमारे यांनी दिले

शाहूनगरवासीयांनी आज दुसऱ्यांदा वाघमारे यांना त्यांच्या केबिनमध्ये घेराव घालून पुन्हा एकदा जाब विचारला .पंधरा दिवसापूर्वी काढण्यात आलेल्या मोर्चामध्ये पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन वाघमारे यांनी दिले होते .मात्र त्यात कोणताच फरक न पडल्याने शाहूनगर वासियांनी पुन्हा मंगळवारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यालयात धडक दिली त्यावेळी खंडित वीजपुरवठा बंद पडणाऱ्या विद्युत मोटारी यामुळे पाणीपुरवठ्याला अडथळा येत असल्याचे कारण देण्यात आले जगतापवाडी शिवनेरी कॉलनी रामराव पवार नगर गोडोली बागडी वस्ती या भागांना आणि पावसाळ्यात टँकरचे पाणी मागवावे लागत आहे हे सर्वसामान्य नागरिकांना परवडणारे नाही अशी तक्रार यावेळी नागरिकांच्या वतीने करण्यात आली .वाघमारे यांनी नागरिकांचा रोष समजावून घेत त्यांना पुन्हा एकदा आश्वासन दिले .जिल्हाधिकारी संतोष पाटील व एम एस ई डी एल म्हणजेच वीज विभागाचे कार्यकारी अभियंता संभाव्य तातडीने बैठक लावून याबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल असे आश्वासन त्यांनी दिले.



यावेळी एडवोकेट सचिन तिरोडकर ,नितीन सूर्यवंशी, माधव मेंढेगिरी, अमोल पाटुकले, अमोल नलावडे, प्रकाश घुले, संतोष घुले, उमेश गोरे, रमेश जमदाडे,रवींद्र डांबे, मोहन पवार, सतीश यादव, अभिजीत बारटक्के, रवी पवार राजा जाधव निखिल माळी प्रसन्न अवसरे जगताप काका इत्यादी उपस्थित होते.

# म्हणून विषमुक्त शेतीसाठी एकत्र येऊन काम करायला हवे

## पद्मश्री राहीबाई पोपेरे

**सांगली/प्रतिनिधी :**

मी अडाणी बाई, पण मला इतकं कळतं की, मातीला जपलं तर माती तुम्हाला जगवते. म्हणून विषमुक्त शेतीसाठी सारे एकत्र येऊन काम करत राहायला पाहिजे. कॅन बायोसिसचे हे उत्पादन आधुनिक शेती करायला खर्चं उपयुक्त आहेत. असे मत पद्मश्री बिजमाता राहीबाई पोपेरे यांनी व्यक्त केले. कृषी क्षेत्रातील कॅन बायोसिसच्या इम्पोर्टेड वॉटर सोल्युबल रोफा तसेच नीम प्रणालीतील विविध १५ उत्पादनांचे लोकार्पण करण्यात आले त्यावेळी त्या बोलत होत्या. तसेच यावेळी त्यांनी आपल्या मनोगतातून मातीचे स्वास्थ्य व आधुनिक शेती तंत्रज्ञानाची ओळख उद्याच्या भविष्याला करून दिली.

यावेळी फार्म डीएसएस ग्रीटेक प्रा. लि. संस्थापक डाळिंबरत्न बाबासाहेब गोरे, आदिनाथ चव्हाण, पुण्याचे प्रिंसिपल सायंटीस्ट डॉ. सुजॉय साहा, डी सँगोजचे मुख्य समुह माहिती अधिकारी जेफ फ्रान्को यांच्यासह सांगली तसेच महाराष्ट्रातील अनेक शेतकरी मान्यवर उपस्थित होते.



याप्रसंगी बोलतांना कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालीका संदीपा कानिटकर म्हणाल्या, रोफा म्हणजे रिअल ऑप्टिमाईज्ड फर्टिलायझर अप्लिकेशन असलं तरी, माझ्यासाठी आर म्हणजे शेतकऱ्यांचा रिस्पेक्ट (आदर) आहे. रोफा हे फ्रान्स मधील तंत्रज्ञान भारतात उपलब्ध करून देण्यासाठी कॅन बायोसिसने डी सँगोज कंपनी सोबत करार केला असून या श्रेणीतील १२ उत्पादने पूर्णतः पाण्यात विरघळणारी, सर्व फळबागा व भाजीपाला पिकांसाठी कुठल्याही हवामानात प्रभावी आहेत. नीम श्रेणीतील सर्व गुणवत्तापूर्ण उत्पादने विषमुक्त कृषी क्षेत्रात क्रांती आणणारी आहेत. त्यामुळे कॅन बायोसिसने आता जगाला शाश्वत शेतीचा खात्रीशीर पर्याय उपलब्ध करून दिला असल्याची भावना मंचावरील उपस्थित तज्ज्ञांनी व्यक्त केली.

# विटयात चार दिवसाच्या विश्रांतीनंतर पावसाने हजेरी व्यापाऱ्यांची दैना

**विटा/प्रतिनिधी:**

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा शहरात गेल्या चार दिवसानंतर पुन्हा सोमवारी दिवसभर व मंगळवारी पहाटे पासून दमदार पाऊसाने सुरुवात केल्याने अक्षरशः नागरीकातून, व्यापाऱ्यातून चांगलीच तारांबळ उडाली.

अचानक पाऊस सुरू झाल्याने शेतकरी पुन्हा हतबल झाला आहे. तर काही ठिकाणी तुरळक पाऊस असल्याने शेतकऱ्यांनी मशागत करून घेतली आहे. तर काही ठिकाणी संतत पाऊस असल्याने रानात उलावा असून शेतकऱ्यांची कामे खोळंबली आहेत. अचानक उघडझाप होणार्या पावसामुळे शेतकर्यांची कामे खोळंबली आहेत. मंगळवारी सकाळी ६ ते ७ वाजता मुसळधार पाऊस झाला तर काही ठिकाणी वीजपुरवठा खंडित करण्यात आला.

# भाजपच्या लौकिकास साजेसे कार्य करू:राहुल महाडीक

**इस्लामपूर/प्रतिनिधी:**

भारतीय जनता पक्ष हा सर्वात मोठी राजकीय संघटना म्हणून राष्ट्रीय पातळीवर यशस्वी झाला आहे. संघटनात्मक मजबूत पक्ष बांधणे हे भारतीय जनता पार्टीचे वैशिष्ट्य आहे. याच विचारांसह वाटचाल करत असताना भाजपच्या लौकिकास साजेसे कार्य करू, असे प्रतिपादन सांगली जिल्हा बँकेचे संचालक राहुल महाडीक यांनी व्यक्त केले.

बावची येथे आयोजित करण्यात आलेल्या पक्ष विस्तार आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष अमोल पडळकर, भाजपा राज्य परिषद सदस्य ज्येष्ठ नेते स्वरुपराव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

राहुल महाडीक म्हणाले, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या माध्यमातून रणनीती आखत असताना बावचीसह परिसरात पक्ष विस्तारासाठी आग्रही भूमिका व पुढाकार घेणार आहे. भारतीय जनता पार्टीच्या विजयी घोडदौडीसाठी प्रयत्नशील राहणार आहे.



दरम्यान, राहुल महाडीक यांनी भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून पूर्ण झालेल्या विकास कामांचा आढावा घेतला.

ज्येष्ठ नेते स्वरुपराव पाटील यांनी पक्ष विस्तारासंबंधी मार्गदर्शन करत असताना समाजातील सर्व स्तरांमध्ये प्रगती साध्य करण्यासाठी भारतीय जनता पार्टीला पर्याय नाही, असे मत विशद केले.

तालुकाध्यक्ष अमोल पडळकर यांनी गावातील पक्ष संघटनेचा आढावा दिला. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य आशिष काळे, मन्सूर मुल्ला, जैनुद्दीन तांबोळी, नागावचे डॉ. राजेंद्र पाटील, युवा नेते शिवाजी पाटील, रवींद्र आवटी, सूरज जाधव, मधुकर खाडे, रवींद्र पोखर्णीकर, सर्वोदय साखर कारखान्याचे संचालक प्रकाश जाधव, वैभव पाटील, सतीश यादव यांच्यासह मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रतिकदादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी इस्लामपूरात रस्सीखेच स्पर्धा

**इस्लामपूर/प्रतिनिधी : -**

सांगली जिल्ह्याचे युवा नेते प्रतिक पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार, दि. १८ जुलै रोजी इस्लामपूर येथे रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. इस्लामपूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने स्पर्धेचे संयोजन केले जात आहे. स्पर्धा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यालयासमोर सकाळी ९ वाजता होणार असल्याची माहिती राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष शहाजी पाटील यांनी दिली.



या स्पर्धेतील प्रथम विजेत्या संघास रुपये ५१ हजार, द्वितीय - ३१ हजार, तृतीय २१ हजार व चतुर्थ - ११ हजार रोख रक्कम बक्षीस दिले जाणार आहे. प्रत्येक संघात आठ खेळाडू हवेत, ही स्पर्धा नॉक आउट किंवा लीग पध्दतीने खेळविली जाईल, संघातील खेळाडू हा त्या-त्या बूथमधीलच हवा आणि पंचांचा निर्णय सर्वाना बंधनकारक असेल. इच्छुक संघांनी गुरुवार, दि. १७ पूर्वी इस्लामपूर येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयात नांवे नोंद करावीत, असे संयोजकांनी आवाहन केले आहे. सचिन कोळी, अभिजीत पाटील, राजेंद्र बाणेकर, रणजीत गायकवाड, स्वरूप मोरे, दिग्विजय पाटील, धीरज भोसले यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते स्पर्धेचे नियोजन करीत आहेत.

# परप्रांतीयावर डिझेल चोरीप्रकरणी गुन्हा दाखल

**कराड प्रतिनिधी : -**

पोकलेनमधील डिझेल चोरी प्रकरणात परप्रांतीय पोकलेन ऑपरेटरचा हात असल्याने त्याच्याविरोधात कराड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सुरेंद्र लालबिहारी यादव (मूळ रा. झारखंड, सध्या रा. जखिणवाडी फाटा, नांदलापूर) असे संशयिताचे नाव आहे. याप्रकरणी जयदीप सर्जेराव मानसकर (रा. मल्हारपेठ) यांनी फिर्याद दाखल केली आहे.

याबाबतची माहिती अशी की, जयदीप मानसकर यांचा पोकलेनसह तीन वाहने पुणे - बंगळूर महामार्गाच्या सहापदरीकरणाच्या कामासाठी लावण्यात आली आहे. या वाहनांवर सरेंद्र यादव हा ऑपरेटर म्हणून काम करत आहे. त्याने एका वाहनातील ६५ लिटर तर अन्य दोन्ही वाहनांमधील प्रत्येकी ७० लिटर असे एकूण २३० डिझेलची चोरी केली आहे. ही घटना समोर येताच शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजू ताशिलदार यांच्यासह सहाय्यक पोलीस निरीक्षक माळी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच याप्रकरणी २० हजार ७०० रूपयांचे डिझेल चोरी केल्याप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक वागवे तपास करत आहेत.

# पडळ येथे दोन चारचाकी वाहनाचा अपघात वाहनचालकावर गुन्हा दाखल

**वडूज/प्रतिनिधी : -**

पडळ (ता. खटाव) येथे दोन चारचाकी वाहनांच्या अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान करून चार जणांना जखमी केल्याप्रकरणी दोन्ही वाहन चालकांविरोधात येथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, मायणी ते म्हसवड (ता. माण) रस्त्यावर ढोकळवाडी गावच्या हद्दीत शनिवारी, दि. १२ सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास म्हसवडहून मायणीच्या दिशेने चारचाकी क्रमांक (एम.एच. ४२ ए.क्यू.३०४९) दोन बैल घेऊन व पाच ते सहा लोकांना घेऊन येत होती.

यावेळी पडळहून विखळे गावाकडे दुसरी चारचाकी क्रमांक (एम.एच.१४ एल.बी. ७३५२) जात होती. या वाहनामध्ये चार ते पाच प्रवासी होते. पडळ फाटा येथील चौकात ही दोन्ही वाहने आल्यानंतर त्यांच्यात अपघात झाला. या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले. तसेच चारजण जखमी झाले. रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगाने वाहने चालवून वाहनांच्या नुकसानीसह दोन्ही वाहनांतील लोकांना किरकोळ व गंभीर जखमी केल्याप्रकणी वाहन चालक धनाजी मारूती निकम (रा. खुडूस ता. माळशिरस, जि. सोलापूर) व रोहीत दत्तात्रय पंके (रा. निगडी, पुणे) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलीस नाईक प्रविण तानाजी सानप यांनी फिर्याद दिली असू पोलीस निरीक्षक घनश्याम सोनवणे तपास करीत आहेत.

# शेवाळेवाडी येवती परिसरात बिबट्याचा शेळ्यांवर हल्ला

**उंडाळे/प्रतिनिधी:**

कराड दक्षिणच्या शेवटच्या टोकावरील शेवाळेवाडी (येवती) ता कराड येथे रविवारी मध्यरात्री बिबट्याने बंदिस्त गोठ्यात बांधलेल्या शेळ्यांवर हल्ला करून दोन शेळ्या फस्त केल्या यामुळे येवती, शेवाळेवाडी, भुरभुशी, घराळवाडी सह परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

शेवाळेवाडी भुरभुशी ही डोंगर माथ्यावरील गावे असून त्याला लागून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचा परिसर आहे. त्यामुळे या परिसरात सातत्याने बिबट्या रानगवे ,रानडुकरे, ससे, कोल्हे, सायाळ, तरस यासह प्राण्यांचा मोठ्या प्रमाणावर वावर आहे. यापूर्वी बिबट्या सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात असल्याने तो सहसा या विभागात फिरकत नव्हता परंतु गेल्या एक-दोन वर्षापासून सातत्याने बिबट्याचे दर्शन होत आहे. या परिसरातील गोटेवाडी, भरेवाडी गणेशवाडी, घराळवाडी, काजारवाडी. या परिसरात शेतात चरावयास गेलेल्या शेळ्या मेंढ्या वर या बिबट्याने अनेकदा हल्ले करून शेळ्या मेंढ्यांना ठार केले आहे. याशिवाय मानवी वस्तीतही त्याचा सातत्याने वावर दिसत होता.

गेल्या चार दिवसापूर्वी भरभुशी येथे काही चार चाकी वाहन चालकांना या बिबट्याने मुख्य रस्त्यावर दर्शन दिले होते. त्यानंतर चार दिवसात या बिबट्याने शेवाळवाडी येथील माणिक भगवान शेवाळे यांच्या मध्यवस्तीतील घराशेजारील गोठ्यात शिरूर त्यांच्या वीस हजार रुपये किमतीच्या दोन शेळ्या ठार केल्या.

# महाबळेश्वर रोटरी क्लब व इनरव्हील क्लबचा गुरुवारी संयुक्तिक पदग्रहण समारंभ

**महाबळेश्वर/प्रतिनिधी :**

सेवा कार्यात अग्रेसर असलेल्या रोटरी क्लब महाबळेश्वर व इनरव्हील क्लब महाबळेश्वर या दोन्ही क्लबचा २०२५-२६ चा संयुक्तिक पदग्रहण समारंभ गुरुवार, १७ जुलै रोजी बाईक रिसॉर्ट येथे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन रोटरी क्लब व इनरव्हील क्लबच्यावतीने करण्यात आले आहे.

महाबळेश्वर रोटरी क्लब अध्यक्षपदाची धुरा मावळते अध्यक्ष रो. दिनेश भिसे यांच्याकडून रो. विजय काळे स्वीकारणार आहे तर सचिव पदाचा पदभार जेष्ठ उद्योजक रो.महेश कोमटी स्वीकारणार आहेत. महाबळेश्वर इनरव्हील क्लबच्या अध्यक्षपदाचा पदभार मावळत्या अध्यक्षा नम्रता बोधे यांच्याकडून सौ.वर्षा संतोष पार्टे या व सचिव पदाची जबाबदारी सौ.सपना अरोरा स्वीकारणार आहेत. गेली तीन दशके वैद्यकीय क्षेत्रामध्ये कार्यरत असलेले जेष्ठ समाजसेवक खेड येथील प्रसिद्ध डॉ संजीव धारिया हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे असणार असून रोटरीचे असि.गव्हर्नर दीपक बागडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.





या कार्यक्रमास उपस्थित रहावून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन रोटरी क्लब व इनरव्हील क्लबच्यावतीने करण्यात आले आहे..





# आदर्श सी.बी.एस.ई.मध्ये लोकनेते हणमंतराव पाटील यांची जयंती उत्साहात साजरी

**विटा/प्रतिनिधी:**

लोकनेते हणमंतराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट संचलित आदर्श पब्लिक स्कूल सी.बी.एस. ई.मध्ये विटा नगरीचे शिल्पकार लोकनेते हणमंतराव पाटील साहेब यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी त्यांच्या प्रतिमेचे पूजन प्रशालेचे प्राचार्य लतीफ मनेर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मराठी विभाग प्रमुख सर्जेराव कांबळे यांनी लोकनेते हणमंतराव पाटील साहेबांचे जीवन कार्य, राजकीय प्रवास सामाजिक कार्याचा आढावा त्यांनी आपल्या भाषणात घेतला.

तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अँड सदाशिवरावभाऊ पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून प्रशालेचे कलाशिक्षक अमित माळकरी, प्रमोद दिवाण यांनी सुंदर असे चित्ररेखाटन, फलक लेखन करून सर्वांची मने जिंकली

या कार्यक्रमासाठी संस्थेचे कार्यकारी संचालक पी.टी.पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले. यावेळी पर्यवेक्षक किरण कांबळे,राजश्री चव्हाण, शिक्षक बांधव विद्यार्थी उपस्थित होते. सांस्कृतिक विभाग प्रमुख रजनी तळेकर यांनी सर्वांचे आभार मानले.

# श्रीमती प्रेमलाताई चव्हाण पॉलिटेक्निक, कराडला अतिउत्कृष्ट ग्रेडेशनचा बहुमान

**कराड/प्रतिनिधी : -**

यशवंत विद्यापीठ, कराड संचलित श्रीमती प्रेमलाताई चव्हाण पॉलिटेक्निक, कराड या तंत्रनिकेतनास महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्यातर्फे सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी 'अतिउत्कृष्ट' ग्रेड प्रदान करण्यात आली आहे.

सदर तंत्रनिकेतन हे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (-खउढए), नवी दिल्ली मान्यताप्राप्त असून १९८४ पासून कार्यरत आहे. संस्थेमध्ये कॉम्प्युटर, इलेक्ट्रिकल, सिव्हिल, मेकॅनिकल इंजिनिअरिंग आणि आर्किटेक्चर या शाखांमध्ये डिप्लोमा अभ्यासक्रम राबवले जातात.

राज्य तंत्रशिक्षण मंडळामार्फत प्रतिवर्षी राज्यातील सर्व तंत्रनिकेतनांचे विविध निकषांवर आधारित परीक्षण करून ग्रेड दिला जातो. यासाठी नियुक्त बाह्य समितीकडून संस्थांना भेटी देऊन पायाभूत सुविधा, शैक्षणिक दर्जा, विद्यार्थ्यांचे निकाल, प्लेसमेंट्स अशा अनेक बाबींची तपासणी केली जाते.

प्राचार्य स्वागत सर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभागप्रमुख, अधिव्याख्याते आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे हे घवघवीत यश प्राप्त झाले आहे.

या यशाबद्दल संस्थेचे सचिव शिरीष किणीकर आणि संस्थापक बी.टी. किणीकर यांनी प्राचार्य व संपूर्ण टीमचे अभिनंदन करून आगामी शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# शिष्यवृत्ती परीक्षेत टिळक हायस्कूलचे उज्वल यश

**कराड/प्रतिनिधी:**

महाराष्ट्र परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत एप्रिल २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत टिळक हायस्कूलने उज्ज्वल यश संपादन केले. इयत्ता आठवीमधील शौनक मंगेश विदार याने २५६ तर निखिल हणमंत कुंभार याने २५२ मिळवून शिष्यवृत्ती प्राप्त केली.

इयत्ता पाचवीतील श्रेयान मनोज कुमार घोलप याने २५२ गुण प्राप्त करून शिष्यवृत्ती मिळवली.विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती विभाग प्रमुख जालिंदर पवार सचिन कुलकर्णी, मार्गदर्शक शिक्षक मेघना भोसले, विजय बोधे, गोविंद पवार, संध्या ठाकर, प्रकाश मोरे, आबाजी मोरे यांनी मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन शाळेचे मुख्याध्यापक धनाजीराव देसाई, उपमुख्याध्यापक किसन वाघमारे, पर्यवेक्षक शरद शिंदे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले.



# उंडाळकर विद्यालयाचा 'घर तिथे शेवगा रोप' उपक्रम

**कोळे/प्रतिनिधी : -**

उंडाळे, ता. कराड येथील स्वातंत्र्यवीर दादासाहेब उंडाळकर माध्यमिक विद्यालयातील हरित सेनेच्या विद्यार्थ्यांनी तयार रोपवाटिकेतून विद्यालयातील सुमारे ५०० विद्यार्थ्यांना औषधी गुणधर्म असलेल्या शेवग्याच्या रोपांचे मोफत वाटप केले. हरीत सेनेच्या 'घर तिथे शेवगा रोप' या अनोख्या उपक्रमाचे विविध स्तरातून कौतुक होत आहे.

उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये हरित सेनेच्या विद्यार्थ्यांनी विद्यालयात शेवग्याची रोपवाटिका तयार केली होती. यासाठी छोट्या प्लास्टिक पिशव्या मध्ये माती भरून त्यामध्ये बारमाही शेवग्याच्या शेंगा येतील, असे उच्च प्रतीचे बियाणे आणून उन्हाळ्यामध्ये त्याची टोकणी केली होती. त्याला पाणी घालून रोपे मोठी करण्यात आली होती. उन्हाळ्याच्या सुट्टीतील काही कालावधी या रोपांचे संगोपन करण्यात विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी घालवला. ही रोपवाटिका प्राचार्य बी. आर. पाटील, पर्यवेक्षक जे. एस. माळी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयातील शिक्षक प्रदीप ओंबासे, शंकर आंबवडे, रवींद्र भोये यांनी ही रोपवाटिका तयार केली होती.



या रोपांचे आज विद्यालयातील विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. सुमारे विद्यालयातील ५०० विद्यार्थ्यांनी हे रोपे आपापल्या घरी नेऊन त्याचे रोपणही करण्यात आले. 'घर तिथे शेवगा रोप' या अनोख्या उपक्रमामुळे परिसरात औषधी गुणधर्म असलेला शेवगा प्रत्येक विद्यार्थ्याला देण्यात आला आहे. या रोपांचे वाटप विद्यालयाचे प्राचार्य. बी. आर. पाटील, पर्यवेक्षक जे. एस. माळी, यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी संख्येने उपस्थित होते.


**सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.**

## नशिबाची परीक्षा

बुधवार १६ जुलै २०२५

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ७-३-८ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 179 467 340 | 7-2 | 156 129 110 | 76-12-03-48-29 |

### कल्याणम

उदय-अस्त | सिंगल ५-०-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 159 140 113 | 5-4 | 130 680 770 | 56-74-01-98-49 |

### मुंबैम (मेन )

उदय-अस्त | सिंगल ३-७-८ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 120 238 229 | 3-6 | 150 169 114 | 31-06-72-81-69 |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

# आज का अंदाज

**बुधवार दिनांक १६ जुलै २०२५**

| कल्याण बाजार 'पत्थर फोड एकच' | मुंबई बाजार 'पत्थर फोड एकच' |
|---|---|
| ० - १ - ४ - ७ | ३ - ५ - ६ - ९ |
| १४५-१४६-१४९-१७९ | १२०-४५६-१७८-२३४ |
| ३८९-४७०-२५७-२७८ | ३००-६९०-३५८-३६० |
| २८०-३८०-३५६-३७७ | २५६-७८०-२७७-४५० |
| जोडी | जोडी |
| ०२ -१२ - ४३ - ७३ | ३२ -५२ - ६१ - ९१ |
| ०५ -१५ - ४६ - ७६ | ३० -५० - ६७ - ९७ |
| ०८ -१८ - ४९ - ७९ | ३४ -५४ - ६८ - ९८ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस १६-१७ जुलै

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

**बुधवार दिनांक १६ जुलै २०२५**

| सर्व बाजार साठी | | | | |
|---|---|---|---|---|
| | २४ | ५४ | ६८ | ९८ |
| | २७ | ५७ | ६३ | ९३ |
| | २० | ५० | ६१ | ९१ |
| | २४६ | १६८ | ६०० | ३८८ |
| | ३९० | ३४८ | ५५६ | २७० |
| | ४८० | २३० | ४६६ | १८० |

टिप- कल्याण व मुंबई करिता व सर्व बाजारासाठी ६० पानाचा चार्ट मिळेल १००% खात्रीशीर फक्त सोमवारी मिळेल

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

# भारताच्या राष्ट्रनिर्माणात शिव-समर्थ परंपरेचे अमूल्य योगदान

## भैय्याजी जोशी; 'श्री शिवचरित्र' व 'श्री समर्थ चरित्र' ग्रंथांचे प्रकाशन, सज्जनांना शक्तिशाली करण्याचे आवाहन

**कराड/प्रतिनिधी : -**

भारत ही पुण्यभूमी, देवभूमी, पराक्रमी पुरुष आणि संतांची कर्मभूमी आहे. अनेक आक्रमणांतून व गुलामगिरीतून मार्ग काढत छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या रूपाने ३५० वर्षांपूर्वी इतिहासाच्या सुवर्णपानाची सुरुवात झाली. या सुवर्णकाळाचे लेखन समर्थ रामदास स्वामींनी केले असून भारताच्या राष्ट्रनिर्माणात शिव-समर्थ परंपरेचे अमूल्य योगदान आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य भैय्याजी जोशी यांनी केले.

येथील कराड अर्बन बँकेच्या शताब्दी सभागृहात श्री समर्थ सेवा मंडळ, सज्जनगड यांच्यावतीने सुप्रसिद्ध विचारवंत कै. साने गुरुजी लिखित 'हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती श्री शिवराय' आणि ज्येष्ठ पत्रकार ज. सी. करंदीकर लिखित 'श्री समर्थ चरित्र' या ग्रंथांचे प्रकाशन भैय्याजी जोशी यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. विशेष म्हणजे श्री शिवरायांचे कार्य भारतभर घरोघरी जावे, या उद्देशाने मराठीसह हिंदी, संस्कृत आणि इंग्रजी भाषांमध्ये या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले आहे.

### शक्ती व संस्कारांचा संगम


श्री समर्थ रामदास स्वामींनी स्थापन केलेल्या अकरा मारुतींचा उद्देश केवळ धार्मिक नव्हता. सज्जन समाज हा दुर्बल असू नये, त्यांच्या मनातही पराक्रमाची ज्वाला पेटावी, हेच समर्थांचे खरे ध्येय होते, असे भैय्याजी जोशी यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री समर्थ सेवा मंडळाचे अध्यक्ष गुरुनाथमहाराज कोटणीस होते. याप्रसंगी सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचे वंशज विक्रमसिंह मोहिते, मंडळाचे कार्यवाह योगेशबुवा रामदासी, विचारवंत डॉ. अच्युत गोडबोले, कराड अर्बन बँकेचे कुटुंबप्रमुख सुभाषराव जोशी, सीए दिलीप गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्रीमंत योगी ही चार गुणांची संगती सांगताना भैय्याजी जोशी म्हणाले, ज्ञान, भक्ती, कर्म आणि साधना या चार अंगांनी समाजातील सज्जन व्यक्ती योगदान देतात. मात्र, या सर्वांचा संगम असलेलाच खरा योगी होतो. छत्रपती शिवाजी महाराज हे असेच एकमेकांमध्ये गुंफलेले चारही गुणांचे मूर्तिमंत रूप होते. म्हणूनच समर्थ रामदास स्वामींनी त्यांना 'श्रीमंत योगी' ही उपाधी दिली,. समर्थ रामदास स्वामींनी शिवरायांना उद्देशून लिहिलेलं पत्र केवळ इतिहास नव्हे, तर एका समाजाला दिलेला आदर्शाचा आरसा आहे. त्यातील प्रत्येक शब्द हे 'श्री शिवचरित्र' या ग्रंथाचे मूर्त स्वरूप आहे, भारत शक्तिशाली आहे, पण त्याची ही शक्ती संहारक नसून संरक्षक आहे. आज देश विविध क्षेत्रांत प्रगती करतो आहे. आपण त्याचे केवळ साक्षीदार न राहता सक्रिय सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

### समर्थ भक्तांचा सन्मान

सातारा जिल्ह्यात धर्मप्रसार आणि सेवा कार्यात सक्रीय असलेल्या समर्थ भक्तांचा सन्मान भैय्याजी जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. कराड अर्बन बँकेच्यावतीने सुभाषराव जोशी आणि दिलीप गुरव यांच्या प्रमुख उपस्थितीत हे सन्मानकार्य पार पाडले.



कराड : 'हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती श्री शिवराय' आणि 'श्री समर्थ चरित्र' या ग्रंथांच्या प्रकाशनप्रसंगी भैय्याजी जोशी, समवेत गुरुनाथमहाराज कोटणीस, विक्रमसिंह मोहिते, योगेशबुवा रामदासी, डॉ. अच्युत गोडबोले.

विक्रमसिंह मोहिते म्हणाले, शिवरायांना जिजाऊ आणि शहाजीराजांनी दिलेल्या धर्म संस्कारांच्या जोडीला वेद, पुराणे, स्मृती, रामायण, महाभारत यांचे गहन अध्ययन होते. त्या अभ्यासाचा खरा परिणाम म्हणजे त्यांची राज्यकारभारातील कृती. यातूनच 'हिंदवी स्वराज्य' अस्तित्वात आले.

त्यांनी तळबीड येथील वीर हनुमान मंदिरात असलेल्या दुर्मिळ अंजनी मातेच्या मूर्तीचा उल्लेख करत ही मूर्ती अभ्यासासाठी महत्त्वाची असून त्यावर सखोल संशोधन व्हावे., असे मत व्यक्त केले.

प्रास्ताविक करताना योगेशबुवा रामदासी म्हणाले, शौर्याचे तेज आणि भक्तीचे तेज एकत्र आले, तेव्हा शिवकालात अलौकिक इतिहास घडला. म्हणूनच शिवराय व समर्थ यांचे चरित्र प्रकाशित करण्यासाठी कराडनगरीची निवड करण्यात आली. कारण ही नगरी दोन नद्यांच्या प्रितीसंगमावर वसलेली आणि ऐतिहासिक वारसा लाभलेली आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र अलोने यांनी केले. तर प्रशांत आवले यांनी आभार मानले. यावेळी संघाचे कोल्हापूर विभाग कार्यवाह विजय जोशी, जिल्हा सहसंघचालक शशिकांत फिरंगे, जिल्हा कार्यवाह वैभव डुबल यांच्यासह कराड व परिसरातील अनेक सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाळवा तालुक्यातील सरपंच आरक्षण जाहीर

**इस्लापूर/प्रतिनिधी:**

अनुसुचित जाती महिलाकरिता पुढील प्रमाणे सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले. कारंदवाडी, साटपेवाडी, पडवळवाडी, ढगेवाडी, विठ्ठलवाडी, वाघवाडी व अनुसुचित जाती सरपंच पदासाठी पुढील ५ ग्रामपंचायती आरक्षित केलेचे जाहीर करणेत आले. काळमवाडी, जुनेखेड, गाँडवाडी, मर्दवाडी, लवंडमाची

सन २०२५ - २०३० कालावधीसाठी अनुसुचित जमाती करिता आरक्षित ग्रामपंचात पुढीलप्रमाणे. कापूसखेड.

नागरीकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी एकूण १३ ग्रामपंचायतीचे सरपंचपद पुढील प्रमाणे आरक्षीत करण्यात आले. शिरटे, चिकुर्डे, नेर्ले, पोखर्णी, ठाणापुडे, इटकरे, फार्णेवाडी शि., शिरगांव, ओझर्डे, कार्वे, रेठरेधरण, देवर्डे, भडकंबे

नागरीकांचा मागास प्रवर्गसाठी एकूण १३ ग्रामपंचायतीचे सरपंचपद पुढील प्रमाणे आरक्षीत करण्यात आले. काकाचीवाडी, बेरडमाची, फाळकेवाडी, बागणी, मिरजवाडी, लाडेगांव, शेणे, केदारवाडी, भरतवाडी, तांदुळवाडी, घबकवाडी, मालेवाडी, कणेगांव

सर्वसाधारणकरिता खालील प्रमाणे २८ ग्रामपंचायती असल्याचे जाहिर करण्यात आले.

बिचूद, कासेगांव, येडेनिपाणी, वाटेगांव, बनेवाडी, भाटवाडी, येडेमच्छिंद्र, भवानीनगर, खरातवाडी, गाताडवाडी, डोंगरवाडी, शिवपूरी, ताकारी, नरसिंहपूर, रेठरेहरणाक्ष, नवेखेड, गोटखिंडी, हुबालवाडी, कुंडलवाडी, मसूचीवाडी, येवलेवाडी, शेखरवाडी, साखराळे, बावची, कि.म गड, शिगांव, नागांव, कोरेगांव

सर्वसाधारण महिलेकरिता खालील प्रमाणे २८ ग्रामपंचायती राखीव असल्याचे जाहिर करण्यात आले.

बहे, सुरुल, तुजारपूर, वशी, करंजवडे, बहादुरवाडी,माणिकवाडी, मरळनाथपूर, धोत्रेवाडी, नायकलवाडी, कोळे, कुरळप, ऐतवडे बु., ऐतवडे खु., पेठ, बोरगांव, तांबवे, ढवळी, वाळवा, फार्णेवाडी बो., जांभुळवाडी, महादेववाडी, दुधारी, अहिरवाडी, येलूर, रोझावाडी, जक्राईवाडी, कामेरी

# पांचगणी गिरिस्थान नगरपरिषदेची स्वच्छ सर्वेक्षण मध्ये देशपातळीवर बाजी

**पाचगणी/प्रतिनिधी:**

पाचगणी नगरपरिषदेने सन २०२४ स्वच्छ सर्वेक्षणात शहर स्वच्छतेत सातत्य व नाविन्यपूर्ण बाबींचा समावेश करत केंद्र सरकार स्वच्छसर्वेक्षणात नेहमीच अव्वल कामगिरी करणाऱ्या पांचगणी गिरिस्थान नगरपरिषदेने यावेळीसुद्धा स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत सुपर स्वच्छ लीग मध्ये सुद्धा बाजी मारली असून याचा पुरस्कार वितरण सोहळा हा दि. १७ जुलै रोजी नवी दिल्ली विज्ञान भवन येथे संपन्न होणार आहे.



स्वच्छ सर्वेक्षण मध्ये सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शहरांसाठी केंद्र सरकारने यावर्षी पासून सुपर स्वच्छ लीग चे आयोजन केले होते. यात सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शहरांसाठी स्वच्छतेच्या बाबतीत अजून काही महत्वाचे नियम व अटी यांचा समावेश करत सदरची स्पर्धा जास्त अवघड केली होती.

स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये 'सुपर स्वच्छ लीग' ही एक नवी आणि महत्त्वपूर्ण श्रेणी समाविष्ट करण्यात आली होती. मागील तीन वर्षे (२०२१, २०२२, २०२३) स्वच्छतेमध्ये सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या निवडक शहरांसाठी ही श्रेणी सुरू करण्यात आली. २०,००० पेक्षा कमी लोकसंख्या गटातील देशभरातील शहरांमध्ये पांचगणी ने आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

'सुपर स्वच्छ लीग'मध्ये आपले स्थान टिकवण्यासाठी एकूण गुणांपैकी किमान ८५% गुण मिळवणे आवश्यक होते आणि पांचगणी शहराने हे आव्हान यशस्वीरीत्या पूर्ण करत ८५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून आपले अग्रस्थान प्राप्त केले आहे.

सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करण्याचा प्रयास आणि पर्यटन स्थळ स्वच्छ व नीटनिटके ठेवण्याच्या प्रयत्नात असलेल्या पांचगणी गिरिस्थान नगरपरिषदेने मुख्याधिकारी श्री पंडित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सदर स्पर्धेत सुद्धा बाजी मारली असून सदर पुरस्कार सोहळा हा दिनांक १७ जुलै रोजी नवी दिल्ली विज्ञान भवन येथे पार पडणार आहे.

# खानापूर तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

## तहसिलदार टोंपे यांनी जारी केले आरक्षण निश्चितीचे पत्रक

**विटा/प्रतिनिधी:**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक जवळ आली असून यानिमित्त खानापूर तालुक्यातील गावांच्या सरपंच पदाची २०२५ - २०३० वर्षांदरम्यान आरक्षण निश्चिती करण्यात आली आहे, असे खानापुर तालुक्याचे तहसिलदार योगेश्वर टोंपे यांनी जाहीर केले आहे. तहसिलदार यांनी सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करताना अनुसूचित जाती, अनुसूचित जाती महिला, अनुसूचीत जमाती महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला, सर्वसाधारण, सर्वसाधारण महिला अशा विभागात केले आहे. ग्रामपंचायतीनुसार आरक्षण जाहीर केले आहे.

सरपंच आरक्षण २०२५ ते २०३० करिता जाहीर झाले असून ते पुढील प्रमाणे आहे. १)अनुसूचित जाती: जाधववाडी, धोंडेवाडी, धोंडगेवाडी, शेडगेवाडी, मादळमुठी ग्रामपंचायतींसाठी जाहीर करण्यात आले आहे. तर २) अनुसूचित जाती (महिला): गोरेवाडी, देवनगर, ताडाचीवाडी, तांदळगांव. ३) अनुसूचित जाती (महिला): नागेवाडी. ४) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग: जाधवनगर, घोटी खु., चिंचणी, वाझर, बाणूरगड, राजधानी भेंडवडे, घोटी बु., हिंगणगादे. ५) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला): ऐनवाडी, बामणी, कार्वे, पोसेवाडी, सांगोले, आळसंद, वाळूज, घानवड, कमळापूर. ६) सर्वसाधारण: भांबर्डे, कळंबी, कुर्ली, रामनगर, बलवडी भा., भिकवडी बु., ढवळेश्वर, मंगरूळ, रेणावी, वेजेगांव, खंबाळे भा., साळशिंगे, देविखिंडी, गार्डी, लेंगरे, मोही, सुलतानगादे, भाग्यनगर, हिवरे. सर्वसाधारण (महिला): भूड, जखीणवाडी, करंजे, माहुली, पंचलिंगनगर, बलवडी खा., बेणापूर, चिखलहोळ, जोंधळखिंडी, पळशी, वलखड, वासुंबे, भडकेवाडी. ७) सर्वसाधारण (महिला): भेंडवडे, रेवणगांव, भाळवणी, मेंगाणवाडी, पारे.



खानापूर तालुक्यातील ग्रामपंचायतींचे आरक्षण जाहीर झाले असून त्या दृष्टीने कोणता उमेदवार द्यायचा, कोणती राजकीय व्यूहरचना करायची, याचे आराखडे आखण्याचे काम प्रत्येक गावात सुरू झाले आहे.



# सांगलीचे अतिरिक्त सीईओ निखिल ओसवाल यांची बदली

## मनोज जाधव नवे अतिरिक्त सीईओ

**सांगली/प्रतिनिधी:**

सांगली जिल्हा परिषदेचे अतिरिक्त सीईओ निखिल ओसवाल यांची बेलापूर नवी मुंबई येथे आज मंगळवारी सायंकाळी बदली झाली आहे. त्यांच्या जागी अकोल्याचे प्रकल्प संचालक मनोज जाधव यांची नियुक्ती झाली आहे. निखिल ओसवाल हे नवी मुंबईतीले परमेश्वर राऊत यांच्या जागी नियुक्ती झाले आहेत.

जिल्हा परिषदेच्या मुख्य सीईओ तृप्ती धोडमिसे, राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान प्रकल्प संचालक नंदिनी घाणेकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद काळे, शशिकांत शिंदे यांच्या हस्ते ओसवाल यांना पुष्पगुच्छ देऊन भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

आज मंगळवारी सायंकाळी बदलीचे आदेश जिल्हा परिषद्र प्रशासनास प्राप्त झाले .

# वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन अल्पवयीनांचे अपहरण

**सातारा/प्रतिनिधी:**

सातारा शहरात घडलेल्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन अल्पवयीनांचे अपहरण केल्याप्रकरणी अज्ञातांविरोधात संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १३ रोजी सायंकाळी आठ वाजण्याच्या सुमारास कोडोली सातारा येथून एका अल्पवयीन मुलीचे अज्ञाताने अपहरण केल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे. अधिक तपास महिला पोलीस उपनिरीक्षक जैस्वाल करीत आहेत.

दुसऱ्या घटनेत, दि. १४ रोजी दुपारी चार ते पावणेसहा वाजण्याच्या दरम्यान सातारा शहर परिसरात राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलाचे अज्ञाताने अपहरण केल्याची फिर्याद शाहूपुरी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक गोवेकर करीत आहेत.

# पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णा नायकवडी हे स्वत:साठी नव्हे तर देशासाठी जगले

## ना.रामदास आठवले

**इस्लापूर/प्रतिनिधी:-**

पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथअण्णा नायकवडी यांची १०३ वी जयंती कार्यक्रमाच्या निमित्त झालेल्या जाहिर सभेत कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक या कार्यक्रमाचे निमंत्रक वैभवकाका नायकवडी म्हणाले, या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अविनाश धर्माधिकारी, संस्थापक संचालक, चाणक्य मंडल परिवार पुणे, पाशा पटेल, अध्यक्ष राज्य कृषीमूल्य आयोग, या कार्यक्रमाचे अध्यक्ष ना. रामदासजी आठवले, केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री, भारत सरकार हे सर्वजण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णाचे वैचारिक वारसदार आहेत. या जयंती निमित्त आजच्या तरुणांना मार्गदर्शनाची गरज आहे. या कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्यार्थी, शेतकरी यांना भविष्यातील भारत देश घडविणेसाठी अण्णांच्या विचारांचा जागर करणेसाठी आजच्या पाहुण्यांचे मार्गदर्शन तरुणांना मार्गदर्शक ठरेल.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अविनाश धर्माधिकारी म्हणाले, क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णांच्या जीवन चरित्राचा अभ्यास केला तर थोर महात्म्ये होऊन गेले चरित्र त्यांचे पहा जरा आपण त्यांच्या समान व्हावे हाच बोध घ्यावा खरा या काव्य पंक्तीतून अण्णांनी स्वातंत्र्य पुर्व व स्वातंत्र्यानंतर केलेल्या कार्याचा आजच्या तरुणांनी आर्दश घ्यावा. जग हे झपाटयाने बदलत आहे. त्यासाठी सर्व तरुणांनी बदलत्या जगाशी समरस होऊन कोणत्याही क्षेत्रात आपले करिअर घडवावे.

यावेळी पाशा पटेल म्हणाले, मी फार मोठा साहित्यीक नाही पण शेती आणि शेतकरी जीवनात येणा-या अडचणीत मुन्नाभाई आहे. पृथ्वीचे जागतिक तापमान वाढले आहे यासाठी सर्वांनी पृथ्वीचे आरोग्य जपणे गरजेचे आहे. यासाठी शेतकरी हा उर्जा उत्पादक झाला पाहिजे यासाठी ऊसापासून, बाबूपासून इथेनॉल निर्मिती करुन हवेतील कार्बनचे प्रर्दुषण कमी करावे लागेल तरच मानव जात २०४७ नंतर वाचेल अन्यथा आजची तरुण पिढी नामशेष होईल ही गंभीर बाब सर्वांनी विचारात घेऊन अण्णांच्या जयंती पासून आपण सर्वांनी निसर्ग वाचविणेसाठी कटिबध्द होऊ.




अध्यक्षपदावरुन बोलताना ना. रामदासजी आठवले म्हणाले, क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णांच्या मुळे माझ्या राजकीय जीवनात खुप मोठा आधार होता. दलित पॅंथर ते रिप्बलीकन पार्टी ऑफ इंडिया पक्ष वाढीसाठी अण्णांन आर्थिक, मानसिक फार मोठा आधार दिला. अण्णांचा पेहराव, अण्णांचा त्याग, निस्वार्थीपणा हा विचार आम्ही आयुष्यभर जपला. १९९८ साली महाराष्ट्रातील सर्व दलित नेत्यांना एकत्र करुन याच ग्रांऊडवरती मोठा सत्कार घेतला. पक्षासाठी टाटा सुमो गाडी प्रदान केली. त्यामुळेच देशभर रिप्बलीकन पार्टी ऑफ इंडिया हा पक्ष कार्यरत आहे. अण्णांच्यामुळेच मी राजकीय जीवनात आमदार, खासदार, मंत्री ही पदे प्राप्त करु शकलो. या सर्व अण्णांच्या उपकारातून उतराई होणेसाठी त्यांच्या स्मारकासाठी माझ्या खासदार फंडातून रु.५०/- लाख निधी जाहिर करतो. तसेच राज्य शासनामार्फत लागणारा निधी देणेस मुख्यमंत्र्यांना शिफारस करतो. अण्णांच्या जीवनावर अनेक कविता सादर करुन उपस्थितांचे वैचारिक प्रबोधन केले.

या कार्यक्रमात गौरवभाऊ नायकवडी यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आभार बाळासाहेब नायकवडी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी प्रा. शिवाजीराव काळुंखे, प्रा.एस. आर.चोपडे, धरणग्रस्त, शेतकरी, कामगार, विद्यार्थी हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

# जाहिर प्रसिध्दी

**जिल्हाधिकारी कार्यालय सातारा**
**क्र. मह/वतन/कावि- ८०७/२०२५**
**सातारा, दि. १५/०७/२०२५.**

तमाम लोकांस कळविणेत येते कि. खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या नवीन शर्तीच्या (इनामवर्ग ६ ब) मिळकती हया श्री गुलाब जानू कांबळे, श्रीमती सुभद्राबाई रमेश यादव, श्रीमती इंदूबाई शांताराम यादव, श्रीमती सिंधूबाई विश्वास यादव, श्रीमती शकुंतला रोहिदास धिवार रा. पळशी ता. खंडाळा जि. सातारा यांच्या हिश्याचे मालकी व ताबे वहिवाटीच्या असून सदर मिळकत त्यांनी श्री. लक्ष्मीकांत मोहनलाल राठी रा. शिरवळ ता. खंडाळा जि. सातारा यांना शेती प्रयोजनार्थ विक्री करण्याचे मान्य व कबूल केलेले आहे. त्यानुसार त्यांचेबरोबर बोलणी चालू आहे. सदर मिळकती पूर्णपणे निर्वेध व निर्जोखमी असल्याचा भरवसा त्यांनी दिलेला आहे. सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही बक्षीस, गहाण, दान, लीन, लीज, पोटगी, चोळीबांगडी खरेदी, साठेखत, करार-मदार, कुळ वहिवाट, इसारपावती इ. कोणत्याही स्वरुपात हक्कसंबंध असल्यास किंवा कोणाची तक्रार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत जिल्हाधिकारी कार्यालय सातारा / तहसिलदार खंडाळा यांचे कार्यालयात मूळ कागदपत्रानिशी खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकतीत असे कोणाचेही हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत, असे समजून सदरचा व्यवहार पूर्ण करणेत येईल व नंतर कोणाचीही हरकत अगर तक्रार चालणार नाही, याची नोंद घेणेत यावी.

शासन परिपत्रक नंबर- इब्ल्यूटीएन १०९९/सीआर/२२९/ल-४, दिनांक १० मार्च २००० मधील मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहिशी करण्याबाबत अधिनियम १९५८ मधील दिलेल्या व मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेकडील परिपत्रक क्र. मह/२/वतन/आरआर/७५१/०९, दिनांक-२९/०९/२००९ चे सूचनेनुसार सदर गावाच्या ५ किलोमीटर परिसरातील इतर वतनदार प्रश्नाधिन जमीन मूळ मालक व नियोजित खरेदीदार यांचेमध्ये ठरलेल्या किमतीस खरेदी घेणेस इच्छुक असल्यास अशा व्यक्तीनी लेखी स्वरुपात १५ दिवसाच्या आत जिल्हाधिकारी कार्यालय सातारा/ तहसिलदार खंडाळा यांचे कार्यालयास लेखी कळवावे.

**परिशिष्ट-**
**गावाचे नांव-मौजे पळशी**
**तालुका-खंडाळा**
**जिल्हा-सातारा**

| ग.नं. | पोट हिस्सा | जमिनीचे एकुण क्षेत्र | | जमिनीचे विक्री करावयाचे क्षेत्र | | आकार | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | हे. | आर | हे. | आर | रुपये | पैसे |
| ३०१ | - | ० | ६१ | ० | ६१ | २ | ६२ |

**गट नंबर ३०१ च्या लगतच्या चतु: सीमा (पंचनाम्यावरून)**

| दिशा | लगतचे ग. नं./सिमा |
|---|---|
| पूर्व | ओढा |
| पश्चिम | शिरवळ पळशी रस्ता |
| दक्षिण | ग.नं. ३०२ |
| उत्तर | गट नं. ३०० |

**सही/-**
**विक्रांत चव्हाण**
**उपजिल्हाधिकारी (महसूल)**
**जिल्हाधिकारी कार्यालय सातारा**

# तासगावातील गाभण मेंढीच्या बळीची प्रथा बंद

## चिखलगोठण ग्रामस्थांचा निर्णय!

**सांगली/प्रतिनिधी:**

आखाडी जत्रेनिमित्त गावच्या ताईआईला गाभण असलेल्या मेंढीचा बळी देण्याची प्रथा या वर्षापासून बंद करत पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण करण्याचा निर्णय तासगाव तालुक्यातील चिखलगोठण येथील ग्रामस्थांनी घेतला असून याची अंमलबजावणीही करण्यात आली. बहुसंख्य गावात ताईआईचे पडीक मंदिर पाहण्यास मिळते. या देवीला काही गावांत ताईबाई असेही म्हटले जाते. या देवीसाठी श्रावण सुरू होण्यापूर्वी आषाढ महिन्यात आषाढी एकादशीनंतर जत्रा करण्याचा प्रघात असून या जत्रेसाठी गर्भवती मेंढीचा बळी दिला जातो.

ताईआईसाठी गर्भवती मेंढीचा बळी देऊन मेंढीच्या पोटातील अर्भक जमिनीत पुरण्यात येते आणि मेंढीच्या मांसाची जेवणावळ भावकी, गावकीसाठी करण्यात येते. हा कार्यक्रम एका रात्रीतच पूर्ण करण्याचे बंधनही पाळण्यात येते. जर काही शिल्लक राहिले तर ते मातीतच पुरण्यात येते. या जेवणाला दुसऱ्या दिवशीचा सूर्य पाहू दिला जात नाही, अशीही पध्दत काही गावांत पाळली जाते.

चिखलगोठण येथे देवीला गर्भवती मेंढीचा बळी देण्याची प्रथा पूर्वांपार चालत आलेली होती. गर्भवती मेंढीचा बळी दिल्यानंतर तिच्या पोटात कधी एक तर कधी दोन अर्भक असायची. त्यांना त्याच जागी पुरण्यात येत होते. ही प्रथा अनेकांना अमान्य होती, मात्र, देवीचा कोप होईल म्हणून पारंपरिक पध्दतीने देवीची यात्रा गेल्या वर्षापर्यंत करण्यात येत होती.

चिखलगोठण गावच्या ताईआईची जत्रा साजरी करण्याबाबत उपसरपंच गुणवंत पाटील यांनी पुढाकार घेत ग्रामस्थांची बैठक बोलावली. या बैठकीत मेंढीचा बळी देण्याच्या विषयावर सांगोपांग चर्चा होऊन ही प्रथाच बंद करण्याचा निर्णय एकमुखाने घेण्यात आला. मेंढीचा बळी देऊन जत्रा साजरी करण्याऐवजी पुरणपोळीचा नैवेद्य देवीला देण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार शनिवारी (दि. १२ जुलै) ताईआईची जत्रा विनाबळीची साजरी करत पुरणपोळीचा नैवेद्य देवीला अर्पण करण्यात आला. गर्भवती मेंढी बळीची प्रथा बंद करण्यासाठी सोसायटीचे माजी अध्यक्ष जगन्नाथ पाटील, ॲड. कृष्णा पाटील, जालिंदर पाटील, सुरेश पाटील, दगडू पाटील, आप्पासाहेब पाटील, तंटामुक्त ग्राम समितीचे माजी अध्यक्ष साहेबराव पाटील, श्रीकांत पाटील, अर्जुन पाटील, अधिकराव पाटील आदी ग्रामस्थांनी पुढाकार घेतला.

# नव्या दोन गणांच्या निर्मितीमुळे कातरखटावकरांची स्वप्नपूर्ती

## खटाव तालुक्यात एक गट व दोन गण वाढले

**वडूज/दत्ता इनामदार : -**

जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या नविन गट, गणांच्या रचनेत खटाव तालुक्यातील कातरखटाव गट व कातरखटावसह दरूज या नव्या दोन गणांच्या निर्मितीमुळे कातरखटावकरांची स्वप्नपूर्ती झाली आहे. तर नवीन दोन गणांमुळे प्रस्थापितांना मतविभागणीचा फटका बसण्याची शक्यता आहे.

नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या नवीन गट व गणांच्या फेररचनेमध्ये खटाव तालुक्यात कातरखटाव या जिल्हा परिषद गटाची, तसेच कातरखटावसह दरूज या नव्या दोन गणांच्या निर्मिती झाली आहे. यापूर्वी खटाव तालुक्यामध्ये जिल्हा परिषदेचे सहा व पंचायत समितीचे बारा गण होते. नव्या फेररचनेमध्ये तालुक्यात जिल्हा परिषदेचे सात व पंचायत समितीचे चौदा गण झाले आहेत.

तालुक्याच्या पूर्व भागातील एक महत्वाचा राजकीय केंद्रबिंदू, तसेच व्यापारी बाजारपेठ असलेल्या कातरखटावचा स्वतंत्र जिल्हा परिषद गट करण्याची मागणी नागरिकांतून गेली अनेक वर्षे होत होती. आज झालेल्या फेररचनेमुळे कातरखटावकरांची स्वप्नपूर्ती झाली आहे. याशिवाय कातरखटाव व दरूज या पंचायत समितीच्या नव्या दोन गणांमुळे प्रस्थापितांना मतविभागणीचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

# शेतकऱ्याचा सातबारा कोरा करा अन्यथा गांजा लागवडीला परवानगी द्या

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजू शेळके यांची मागणी

**सातारा/प्रतिनिधी:**

राज्य शासनाने राज्यातील शेतकऱ्याचा सातबारा पूर्णतः कोरा करावे सरकारने निवडणुकीत कर्जमाफीचा शेतकऱ्यांना विविध आश्वासने दिली होती ती आश्वासने पाळायला जमत नसतील तर शेतामध्ये शेतकऱ्यांना गांजा लावायची परवानगी द्यावी . त्याचे मूल्यांकन पोलिसांनी करावे अशी संतप्त मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजू शेळके यांनी केली आहे .

याबाबत प्रसिध्दी पत्रकात नमूद आहे की राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे . राज्य सहकारी शेतकरी विरोधी धोरण याला जबाबदार आहे . शेतकऱ्याच्या मालाला हमीभाव मिळत नाही, बाजारपेठेत बोगस बियाणे, खते, कीटनाशके औषधे यांचा सुळसुळाट आहे .शेतकरी कर्जबाजारी करण्यात सरकार व प्रशासन यांचा वाटा आहे .सरकार शेतमालाला भाव देऊ शकत नसेल आणि सातबारा कोरा करण्याची त्यांची तयारी नसेल तर शेतकऱ्याला शेतात गांजा लावायची परवानगी द्यावी.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत गांजाला करोड रुपयाचा भाव आहे गेल्याच आठवड्यात तामिळनाडूमध्ये विमानतळावर साडेअकरा किलो गांजा पकडण्यात आला एक किलो गांजा ला करोडचा भाव मिळत असेल तर महाराष्ट्रातील आर्थिक अडचणीत व खोट्या आश्वासनावर अवलंबून राहणाऱ्या शेतकऱ्याला किलोला लाख रुपये भाव तरी मिळावा तर तो कर्जमुक्त होऊन सरकारला कर्ज देईल.

राज्यातील शासकीय कृषी व्यवस्था राजकीय पाठिंबा असलेल्या दलालांच्या ताब्यात आहे .खाजगी दुकानदारांच्या प्रभावाखाली चालणारी कृषी उत्पन्न बाजार समितीचे दुकाने शेतकऱ्यांना लुटत आहेत कांदा सोयाबीन दूध ऊस भाजीपाला हे कवडीमोल भावाने खरेदी केले जात आहेत .सरकारने तातडीने याबाबत पावले उचलावीत आणि शेतकऱ्याला वाचवावे अशी मागणी राजू शेळके यांनी केली आहे.